1

जा. क्र. ३/२८/१८ 25 MAY 2018

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८
दुरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०

## परिपत्रक क्र. ५३९ दिनांक २५/०५/२०१८

राज्यातील सर्व अधिका-यांना असे निर्देशित करण्यात येते की, राज्यामध्ये अनेक जिल्हयांमध्ये अथवा तालुक्यांमध्ये डायलिसिस सेंटर (Dialysis Center) उपलब्ध नाहीत. त्यामुळे गरीब रुग्णांना उपलब्ध ठिकाणी प्रवास करुन जावे लागत आहे. त्यामुळे गरीब रुग्णांना आर्थिक भुर्दंड तर होत आहेच, परंतु मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे. महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था कायद्यातील विश्वस्त संस्थांच्या उददेशान्वये गरीब लोकांची सेवा करणे, इतरांना मदत करणे व गरीब लोकांना वैद्यकीय सेवा देणे हे ही अभिप्रेत आहे. धर्मादाय संस्थांचे पालनकर्ता म्हणून अशा विविध संस्थांमार्फत गरीब रुग्णांना व गरीब लोकांना योग्य सुविधा मिळतात की नाही अथवा योग्य त्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देणे हा ही आपल्या कामकाजाचा भाग आहे. धर्मादाय कार्यालयांमार्फत नुकतेच सर्वधर्मीय विवाह सोहळे आयोजित केले आहेत व या विवाह सोहळयांतर्गत प्रत्येक जिल्हा स्तरावर समित्यांची स्थापना केली असून या समित्यांच्या सहकार्याने व जिल्हा स्तरावरील धर्मादाय रुग्णालयांच्या सहकार्याने अथवा खाजगी रुग्णालयांच्या सहकार्याने आपण जिल्हा स्तरावर अथवा तालुका स्तरावर डायलिसिस केंद्र उभारण्यास प्रोत्साहन द्यावे. सदरील केंद्र उभारणीसाठी त्या त्या जिल्यातील धार्मिक स्थळांकडून निधी घ्यावा. सदरील डायलेसिस केंद्र कार्यरत राहण्यासाठी त्या त्या जिल्हयातील धार्मिक स्थळांकडून निधी

घ्यावा अथवा इतर सामाजिक, शैक्षणिक संस्थांकडून हा निधी घ्यावा. सदरील निधी घेताना कोणावरही दबाव टाकू नये अथवा बंधनकारक करु नये. हा निधी जिल्हास्तरीय समितीमार्फत स्विकारावा, जिल्हास्तरीय समिती नसेल तर धर्मादाय रुग्णालय अथवा संबंधित रुग्णालयामार्फत स्विकारावा व त्याचा हिशोब ठेवावा. ज्या संस्थामध्ये वाद आहे अशा विश्वस्तांकडून निधी घेण्यात येऊ नये. सदरील डायलिसिस सेंटर मध्ये गरीबांना नाममात्र दरात उपचार उपलब्ध करुन द्यावेत.

(शि. ग. डिगे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)